महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ०४

शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एस.डी.४,

दिनांक ८ ऑगस्ट,२०१९ नुसार

इयता १०वी –मराठी

(व्दितीय भाषा)

सुधारित मूल्यमापन आराखडा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

विषय – मराठी – अक्षरभारती (द्वितीय भाषा)

इयत्ता – १० वी

घटकनिहाय गुणविभागणी

घटक	एकूण गुण
गद्य	१८
पद्य	१६
स्थूलवाचन	०६
भाषाभ्यास	१६
उपयोजित लेखन	२४
एकूण	८०

कृतिपत्रिका आराखडा

विभाग–१

गद्य – **१८ गुण**

अ) १पठित उतारा– ०७ गुण } १३० ते १५० शब्द

आ) १पठित उतारा– ०७ गुण }

इ) अपठित उतारा– ०४ गुण } ८० ते १०० शब्द

अ आणि आ – ०७ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१) आकलन कृती – ०२ गुण

२) आकलन कृती – ०२ गुण

३) स्वमत – ०३ गुण

इ – ०४ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१) आकलन कृती – ०२ गुण

२) आकलन कृती – ०२ गुण

विभाग-०२

पद्य **एकूण १६ गुण**

अ) पठित पद्य ०८ गुण

आ) पठित पद्य ०८ गुण

अ) पाठयपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या पद्यांपैकी कोणतीही एक कविता कृतिपत्रिकेत देणे

८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

१) आकलन कृती - ०२ गुण
२) आकलन कृती- ०२ गुण
३) कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ ०२ गुण
४) काव्यसौंदर्य ०२ गुण

(दिलेल्या पद्यातील कोणत्याही २ ओळी देऊन त्यावर काव्यसौंदर्यासाठी योग्य कृती विचारणे)

आ) कवितेवरील आधारित कृती - ०८ गुण

'अ' साठी दिलेली कविता सोडून पाठ्यपुस्तकातील कोणत्याही दोन कवितांची फक्त नावे कृतिपत्रिकेत देणे व त्यावर आधारित कृती विचारणे

८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी

खालील मुद्दयांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा. ०८ गुण
कवितेवर आधारित कृती

०८ गुणांसाठी खालीलपैकी कोणत्याही कृती विचारणे

प्रत्येक कृती १ किंवा २ गुणांचीच असावी ½ गुणासाठी कृती विचारली जावू नये.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - ०१ गुण
२) प्रस्तुत कवितेचा विषय- ०१ गुण
३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा - ०२ गुण
(कवितेतील कोणतेही २ शब्द देणे व दोन्ही सोडवणे. प्रत्येकी ०१ गुण)
४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश लिहा ०२ गुण
५) प्रस्तुत कवितेची भाषिक वैशिष्ट्ये लिहा ०२ गुण
६) कवितेतून व्यक्त होणारा विचार लिहा ०२ गुण

७) कवितेतील दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा ०२ गुण

८) प्रस्तुत कविता तुम्हाला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण लिहा ०२ गुण

कृती क्र. ३ व ७ साठी दोन्ही कवितांमधील शब्द व ओळी स्वतंत्र देऊन त्यांपैकी कोणत्याही एका कवितेवरील कृती सोडवणे अपेक्षित.

विभाग-०३

स्थूलवाचन **एकूण ०६ गुण**

प्रत्येकी ०३/०३ गुणांच्या २ कृती

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित ३ कृती देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित)

विभाग -०४

भाषाभ्यास **एकूण १६ गुण**

अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती **०८ गुण**

१) वाक्यप्रकार ०२ गुण

विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्‌गारार्थी, आज्ञार्थी वाक्य ओळखणे.

(२ वाक्ये देणे. प्रत्येकी १ गुण)

२) वाक्य रूपांतर ०२ गुण

(२ वाक्ये देणे. प्रत्येकी १ गुण)

१) प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

२) उद्‌गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

३) आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

४) होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

३) वाक्‌प्रचार **०४ गुण**

(वाक्‌प्रचारांचा अर्थ सांगून त्या वाक्‌प्रचारांचा वाक्यात उपयोग करणे)

कृतिपत्रिकेत ३ वाक्‌प्रचार देणे व त्यांपैकी २ सोडविणे अपेक्षित

प्रत्येकी १ गुण अर्थासाठी व १ गुण वाक्‌प्रचारांच्या वाक्यात उपयोगासाठी)

(३ वाक्‌प्रचार देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित) (प्रत्येकी २ गुण)

आ) भाषिक घटकांवर आधारित कृती - **०८ गुण**

१) शब्दसंपत्ती- - **०४गुण**

अ) समानार्थी शब्द -
ब) विरुद्धार्थी शब्द-
क) एकवचन/ अनेकवचन
वचन बदला/वचन ओळखा-
ड) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहिणे
तीन शब्दसमूह देणे त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित
ई) शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे

यांपैकी कोणत्याही ४ घटकांवर
प्रत्येकी १ गुणांच्या ४ कृती विचारणे

२) लेखननियमांनुसार लेखन- **०२ गुण**

१) अचूक शब्द ओळखा - (कोणतेही २ शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे, पर्यायातील ०४ पैकी एकच शब्द (लेखननियामांनुसार) अचूक असावा. वरील दोन शब्द पर्यायासह देणे. दोन्ही सोडवणे अपेक्षित (प्रत्येकी १ गुण)

किंवा

२) वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा व वाक्ये पुन्हा लिहा.
(दोन वाक्ये देणे व दोन्ही वाक्ये सोडवणे अपेक्षित)
प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार २ शब्द चुकीचे असतील अशी वाक्ये देणे.
(प्रत्येकी १ गुण)
(प्रत्येक कृतिपत्रिकेत वरीलपैकी कोणतीही एक कृती विचारणे अपेक्षित)

३) विरामचिन्हे - **०२ गुण**

१. योग्य विरामचिन्हे वापरा.
२. विरामचिन्हे ओळखा
३. चुकीची विरामचिन्हे बदला.

यांपैकी ०२ गुणासाठी कोणतीही कृती विचारणे

विभाग –०५

उपयोजित लेखन — **२४ गुण**

अ) पत्रलेखन — ०६ गुण



किंवा

अपठित गद्य उताऱ्याचे सारांश लेखन

(विभाग १ गद्य – इ (प्र.१ इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा सारांश लिहिणे)

१० गुण

आ) १) जाहिरात लेखन
२) बातमी लेखन
३) कथा लेखन

लेखन प्रकारानुसार ६० ते ९० शब्द

कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर आधारित कृती देणे त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित (प्रत्येकी ५ गुण)

इ) लेखनकौशल्य (१०० ते १२० शब्द) — ०८ गुण

१) प्रसंग लेखन
२) आत्मकथन
३) वैचारिक

कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर आधारित कृती देणे त्यांपैकी १ सोडवणे अपेक्षित

विकल्पासह घटकनिहाय गुणविभागणी

घटक	एकूण गुण	विकल्प गुण	विकल्पासह एकूण गुण
गद्य	१८	–	१८
पद्य	१६	–	१६
स्थूलवाचन	०६	०३	०९
भाषाभ्यास	१६	०२	१८
उपयोजित लेखन	२४	२५	४९
एकूण	८०	३०	११०

काठिण्य पातळीनुसार घटकनिहाय गुणविभागणी
प्रथम भाषा – कुमारभारती

घटक	सोपे	मध्यम	क्ठीण	एकूण
गद्य	०६	०६	०६	१८
पद्य	०८	०८	--	१६
स्थूलवाचन	--	०६	--	०६
भाषाभ्यास	१२	०४	--	१६
उपयोजित लेखन	०६	०८	१०	२४
एकूण	३२ ४०%	३२ ४०%	१६ २०%	८०

१. कृतिपत्रिकेतील कृतींची काठिण्यपातळी 40% सोपे , 40% मध्यम, 20% अवघड/कठीण अशी ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार कृतिपत्रिका काढणे आवश्यक आहे.

२. कृतिपत्रिका काढतांना ही काठिण्यपातळी घटकसापेक्ष बदलू शकते. तसा बदल कृतिपत्रिकेत करत येईल. परंतु कृतिपत्रिकेची काठिण्यपातळी मात्र सोपे 40% मध्यम 40% अवघड 20%ही टक्केवारी बदलणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

अंतर्गत मूल्यमापन – गुण २०

इयत्ता १० वी मराठी – अक्षरभारती

अ) श्रवण कौशल्य – ०५ गुण

आ) भाषण कौशल्य – ०५ गुण

इ) स्वाध्याय – १० गुण

***तोंडी परीक्षेकरिता खालीलपैकी कोणतीही दोन कौशल्ये निवडणे अपेक्षित.**

अ) श्रवण कौशल्य (खालीलपैकी कोणतेही एक निवडणे.)

श्रवण कौशल्याची चाचणी 'श्रवण लेखन'स्वरुपात घेणे अपेक्षित आहे. विद्यार्थी संख्या आणि उपलब्ध वेळ यानुसार विद्यार्थ्यांचे गट करावेत. खालील चार पर्यायांपैकी कोणताही एक पर्याय श्रवण कौशल्यासाठी निवडावा.

१) परिच्छेद ऐकून त्यावर आधारित विचारलेल्या वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे.

(किमान ०५ प्रश्न) (योग्य उत्तरास प्रत्येकी ०१ गुण)

सूचना –

i) निवडलेला परिच्छेद पाठयपुस्तकातील असावा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)

ii) प्रस्तुत परिच्छेदावर किमान ०५ वस्तुनिष्ठ प्रश्न तयार करावेत.

iii) प्रश्न फळयावर लिहून द्यावेत.

iv) प्रस्तुत परिच्छेद किमान २ वेळा सावकाश, स्पष्टपणे वाचून दाखवावा.

v) फळयावर लिहिलेल्या ५ प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी स्वतंत्र उत्तरपत्रिकेच्या पुरवणीवर लिहिणे अपेक्षित आहे.

vi) प्रत्येक गटासाठी स्वतंत्र परिच्छेद निवडावा.

vii) प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे योग्य उत्तरास गुणदान करावे.

viii) एकूण गुण पाचपैकी दयावेत.

ix) निवडलेले परिच्छेद, त्यावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न, विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिका व गुणपत्रक शालेय स्तरावर जपून ठेवावे.

२) ५ वाक्ये किंवा १० शब्द ऐकून लिहिणे.

(योग्य वाक्यास प्रत्येकी एक गुण, योग्य १० शब्द लिहिल्यास प्रत्येकी अर्धा गुण)

वाक्यांसंदर्भात सूचना –

i) पाठयपुस्तकातील कोणतीही ०५ वाक्ये निवडावीत.

ii) ४ ते ५ शब्दांचे वाक्य असावे.

iii) २ सोपी, २ मध्यम व १ कठीण याप्रकारे वाक्ये निवडावीत.

iv) प्रत्येक वाक्य किमान २ वेळा सुस्पष्टपणे वाचून दाखवावे.

v) एकेक वाक्य शिक्षकांनी वाचून विद्यार्थ्यांनी ते ऐकून उत्तरपत्रिकेच्या पुरवणीवर लिहिणे अपेक्षित आहे.

किंवा

शब्दांसंदर्भात सूचना –

i) पाठयपुस्तकातील १० शब्दांची निवड करावी.

ii) ४ सोपे, ४ मध्यम, २ कठीण याप्रकारे शब्दांची निवड करावी.

iii) शिक्षकांनी एकेक शब्द किमान २ वेळा सुस्पष्टपणे वाचून दाखवावा.

iv) एकेक शब्द शिक्षकांनी वाचून विद्यार्थ्यांनी तो ऐकून उत्तरपत्रिकेच्या पुरवणीवर लिहिणे अपेक्षित आहे.

*** श्रवणकौशल्यासाठी निवडलेली पाच वाक्ये किंवा दहा शब्द – गटवार नियोजनानुसार लिखित स्वरुपात असावीत.**

ऐकून लिहिलेली वाक्ये किंवा शब्द यासंबंधीच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकांच्या पुरवण्या व गुणपत्रक शालेयस्तरावर जपून ठेवावे.

३) कविता ऐकून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
(किमान ५ प्रश्न)(योग्य उत्तरास प्रत्येकी १ गुण)

सूचना –

i) पाठयपुस्तकातील कविता निवडणे अपेक्षित.

ii) निवडलेल्या कवितेवर ०५ वस्तुनिष्ठ प्रश्न तयार करावेत.

iii) कवितेवरील प्रश्न फळयावर लिहावेत.

iv) प्रस्तुत कविता किमान दोन वेळा सावकाश लयीत, स्पष्टपणे वाचून दाखवावी.

v) फळयावर लिहिलेल्या पाच प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी स्वतंत्र उत्तरपत्रिकेच्या पुरवणीवर लिहिणे अपेक्षित आहे.

vi) प्रत्येक गटासाठी स्वतंत्र कविता निवडावी.

vii) प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे योग्य उत्तरास गुणदान करावे.

viii) एकूण गुण ५ पैकी दयावेत.

ix) निवडलेल्या कविता, त्यांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न, विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिका व गुणपत्रक शालेय स्तरावर जपून ठेवावे.

४) ऑडिओक्लिप ऐकून त्यांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे.

(किमान ५ प्रश्न) (योग्य उत्तरास प्रत्येकी ०१ गुण)

सूचना –

i) पाठयपुस्तकातील पाठयांशावर आधारित ऑडिओक्लिप ऐकवावी.

ii) ऑडिओक्लिप स्वतः तयार करावी.

iii) निर्दोष असावी.

iv) प्रत्येक गटासाठी स्वतंत्र ऑडिओक्लिप असावी.

v) ऑडिओक्लिप वर आधारित ५ वस्तुनिष्ठ प्रश्न तयार करावेत.

vi) हे प्रश्न ऑडिओक्लिप ऐकवण्यापूर्वी फळयावर लिहावेत.

vii) ऑडिओक्लिप किमान २ वेळा विद्यार्थ्यांना ऐकवून विद्यार्थ्यांनी संबंधित ५ प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेच्या पुरवणीवर लिहिणे अपेक्षित आहे.

viii) प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे योग्य उत्तरास गुणदान करावे.

ix) एकूण गुण ५ पैकी दयावेत.

x) ऑडिओ क्लिप सोडून त्यावर आधरित ५ प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी स्वतंत्र उत्तरपत्रिकेच्या पुरवणीवर लिहिणे अपेक्षित.

xi) ऑडिओक्लिप, त्यांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न, विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिका व गुणपत्रक शालेयस्तरावर जपून ठेवावे.

आ) भाषण कौशल्य

(खालीलपैकी कोणतेही एक)

'भाषण' हे एक महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. विदयार्थ्यांनी ऐकलेला, वाचलेला, अनुभवलेला प्रसंग भाषेद्वारे व्यक्त करणे किंवा स्वत:चे विचार, मत योग्य भाषेत प्रकट करणे, या कौशल्यात अभिप्रेत आहे.

विचारांची स्पष्टता, मांडणी, समर्पक शब्दरचना, भाषिक समज, सभाधीटपणा इत्यादी मुद्दे भाषण कौशल्याच्या मूल्यमापनात विचारात घ्यावेत.

1) वाचन केलेल्या कोणत्याही एका पुस्तकाविषयीचे स्वमत प्रकट करणे.

सूचना –

i) विदयार्थ्यांच्या वयोगटानुसार कोणतीही दहा पुस्तके निवडावीत. या पुस्तकांची यादी विदयार्थ्यांना वर्षाच्या सुरूवातीस दयावी.

ii) ही पुस्तके विदयार्थ्यांना शालेय वाचनालयात सहज उपलब्ध होतील, अशी व्यवस्था करावी.

iii) विदयार्थ्यांनी या व्यतिरिक्त स्वत:हून वेगळे पुस्तके निवडले तरी त्याचे स्वागत करावे.

iv) विदयार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकाविषयी स्वत:चे मत किमान ०३ मिनिटात व्यक्त करणे अपेक्षित आहे.

v) स्वमत प्रकटीकरणात – पुस्तकाचे नाव, लेखक, पुस्तकात मांडलेला विचार, लेखनशैली, पुस्तक आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण, पुस्तकाचा प्रभाव इत्यादी मुद्दे विचारात घ्यावेत.

vi) शालेय स्तरावर प्रत्येक विदयार्थ्याचे भाषण कौशल्य स्वतंत्रपणे तपासावे. गुणदान योजनेतील तक्त्यानुसार योग्य गुणदान करणे अपेक्षित आहे.

vii) प्रत्येक विदयार्थ्यांची यासंबधीची सविस्तर नोंद असलेली वही शालेय स्तरावर जपून ठेवणे आवश्यक आहे.

2) दिलेल्या विषयांवर विचार प्रकट करणे.
(सदर विषय विदयार्थ्यांच्या अनुभवविश्वाशी सुसंगत असावेत.)

सूचना –

i) विदयार्थ्यांच्या भावविश्वाशी निगडीत असे दहा ते पंधरा विषय विदयार्थ्यांसमोर ठेवावेत.

ii) या विषयांवर शिक्षकांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे.

iii) विदयार्थ्यांना विषय – निवडीचे स्वातंत्र्य दयावे.

iv) २ ते ३ मिनिटे कालमर्यादा असावी.

v) या कौशल्याचा अंतिम परीक्षेआधी किमान तीन वेळा सराव व्हावा.

vi) विचारप्रकटीकरणात – विषयाला धरून केलेला विचार, सूत्रबद्ध मांडणी, समर्पक भाषा, आत्मविश्वास इत्यादी मुद्दे विचारात घेऊन मूल्यमापन होणे अपेक्षित आहे.

vii) शालेय स्तरावर प्रत्येक विदयार्थ्यांचे विचार – प्रकटीकरण स्वतंत्रपणे तपासावे. गुणदान योजनेतील तक्त्यानुसार योग्य गुणदान करणे अपेक्षित आहे.

viii) प्रत्येक विदयार्थ्यांची यासंबंधीची सविस्तर नोंद असलेली वही शालेय स्तरावर जपून ठेवणे आवश्यक आहे.

3) पाठयपुस्तकातील पाठ किंवा कविता यांवर ८ ते १० वाक्यांमध्ये आपले विचार प्रकट करणे.
(विषयानुसार मांडणी, भाषाशैली, सभाधीटपणा, आकर्षक सुरूवात – योग्य शेवट या मुद्दयांचा विचार

गुणदानासाठी करणे अपेक्षित.)

सूचना–

i) प्रस्तुत संदर्भानुसार शिक्षकांकडून विशिष्ट मार्गदर्शन अपेक्षित आहे.

ii) पाठ अथवा कवितेसंबंधी स्वत:चे विचार प्रकट करतांना विदयार्थ्यांनी खालील मुद्दे विचारात घ्यावेत.

पाठ अथवा कवितेचे नाव, लेखक अथवा कवी/कवयित्री, पाठाची /कवितेची मध्यवर्ती कल्पना, विचार, पाठ/कविता आवडणे वा न आवडणे यामागील विचार

iii) प्रत्येक विदयार्थ्याचे संबंधित पाठ/कवितेवरील विचार स्वतंत्रपणे ऐकून मूल्यमापन करावे.

iv) गुणदान योजनेतील तक्त्यानुसार योग्य गुणदान करणे अपेक्षित आहे.

v) प्रत्येक विदयार्थ्याची यासंबंधीची सविस्तर नोंद असलेली वही शालेय स्तरावर जपून ठेवणे आवश्यक आहे.

महत्त्वाचे –

श्रवण व भाषण कौशल्यांचे अंतर्गत मूल्यमापन शालेयस्तरावर होणार असले तरी ते पारदर्शक व्हावे. अंतर्गत मूल्यमापनाचे गांभीर्य लक्षात ठेवावे.

श्रवण व भाषण कौशल्यांच्या अंतिम मूल्यमापनापूर्वी उपलब्ध वेळेनुसार साधारणत: तीन वेळा सराव द्यावा.

इ) स्वाध्याय – १० गुण

सूचना–

i) प्रत्येक विदयार्थ्याने संपूर्ण वर्षात दोन स्वाध्याय पूर्ण करणे अपेक्षित आहे.

ii) प्रत्येक स्वाध्यायास ०५ गुण.

iii) दोन पैकी एक स्वाध्याय गदय अथवा पदय घटकावर आधारित असावा. स्वाध्यायात आकलन, स्वमत, अभिव्यक्ती इत्यादी प्रकारांच्या कृती असणे अपेक्षित आहे.

iv) दुसरा स्वाध्याय उपयोजित लेखनातील घटकांवर आधारित असावा. या घटकांपैकी कोणताही एक घटक स्वाध्यायासाठी निवडावा.

v) हे दोन स्वाध्याय शालेय उत्तरपत्रिकेच्या दोन स्वतंत्र पुरवण्यांवर लिहिलेले असावेत.

vi) हे स्वाध्याय तपासून योग्य गुणदान करावे.

vii) तपासलेल्या उत्तरपत्रिका व गुणयादया शालेयस्तरावर जपून ठेवाव्यात.

अंतर्गत मूल्यमापन – गुणपत्रिका

एकूण गुण – २०

अ. क्र.	परीक्षा क्रमांक	अ (५ गुण) (श्रवण कौशल्य)	आ (५ गुण) + (भाषण कौशल्य)	इ (१० गुण) + (स्वाध्याय)	एकूण गुण = (२० पैकी)

अ) श्रवण कौशल्य – ०५ गुण

खालीलपैकी कोणतेही एक कौशल्य निवडा. निवडलेल्या कौशल्यावर ✓खूण करा.

अ. क्र.	परीक्षा क्रमांक	०१	०२	०३	०४
		परिच्छेद ऐकून त्यांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे.	५ वाक्ये किंवा १० शब्द ऐकून लिहिणे.	कविता ऐकून त्यांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे	ऑडिओ क्लीप ऐकवून त्यांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे

आ) भाषण कौशल्य – ०५ गुण

खालीलपैकी कोणतेही एक कौशल्य निवडा. गुणदान तक्त्यातील योजनेनुसार गुणांची नोंद करा.

१) वाचन केलेल्या कोणत्याही एका पुस्तकाविषयीचे स्वमत प्रकट करणे.

अ. क्र.	परीक्षा क्रमांक	पुस्तकाचे नाव व लेखकाचे नाव (०१ गुण)	विषयाला समर्पक स्वमत मांडणी (०३ गुण)	भाषाशैली (०१ गुण)	एकूण गुण (०५ पैकी)

२) दिलेल्या विषयांवर विचार प्रकट करणे

अ. क्र.	परीक्षा क्रमांक	निवडलेला विषय (०१ गुण)	विषयानुसार समर्पक विचार मांडणी(०३ गुण)	भाषाशैली (०१ गुण)	एकूण गुण (०५ पैकी)

३) पाठयपुस्तकातील पाठ किंवा कविता यावर ८ ते १० वाक्यांत आपले विचार प्रकट करणे

अ. क्र.	परीक्षा क्रमांक	निवडलेला पाठाचे किंवा कवितेचे नाव (०१ गुण)	निवडलेल्या घटकाविषयी समर्पक विचार मांडणी (०३ गुण)	भाषाशैली (०१ गुण)	एकूण गुण (०५ पैकी)

इ) स्वाध्याय – १० गुण

विदयार्थ्याविषयी विशेष नोंद